CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

पुण्य नगरी

Navi Mumbai Edition
Jan 21, 2025 Page No. 03

# बेलापूर परिसरातील अनधिकृत बांधकामांवर सिडकोचा बुलडोझर

**नवी मुंबई :** सिडकोच्या अतिक्रमण विभागाने धडक कारवाई करून बेलापूर शहाबाज येथील इमारतींचे सुरू असलेले बांधकाम जमीनदोस्त केले. नवी मुंबई महापालिकेच्या हद्दीत सिडकोच्या गावठाण विस्तारमधील मोकळ्या भूखंडावर अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणावर केली जात आहेत. बेलापूर विभागातील शहाबाज येथील मधुकर म्हात्रे यांनी सीबीडी सेक्टर -१९/२० येथील सर्व्हे नंबर ४१६ व ४१८ या मोकळ्या भूखंडावर इमारतीचे अनधिकृत बांधकाम सुरू केले होते. सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने १६ जानेवारी रोजी एमआरटीपी कायद्यांतर्गत त्यांना नोटीस बजावली होती. तरीदेखील बांधकाम सुरू असल्याने इमारतीचे फुटिंग आणि कॉलमचे काम सुरू असताना सिडकोने कारवाई करून हे बांधकाम जमीनदोस्त केले.



तसेच शहाबाज येथील सर्व्हे नंबर ४२८ भूखंड क्रमांक बी/३९१,३९० व ३८९ वर समीर मानकामे यांनी देखील सिडको व नवी मुंबई पालिकेची कोणतीही परवानगी न घेता इमारतीचे बांधकाम सुरू केल्याने सिडकोच्या अतिक्रमण विभागाने ४ जानेवारी रोजी एमआरटीपी कायद्यांतर्गत नोटीस बजावून भूखंड जैसे थे करण्यास सांगितले. मात्र, सिडकोच्या नोटिशीनंतर देखील इमारतीचे बांधकाम सुरू असल्याने सिडकोच्या अतिक्रमण नियंत्रण विभागाने कारवाई करून बांधकाम जमीनदोस्त केले. ही कारवाई सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोच्या अतिक्रमण नियंत्रण विभागाचे अधिकारी व सुरक्षा रक्षक यांनी केली.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 1 Jan 21, 2025

# उरणमधील हातगाड्या, टपऱ्यांवर सिडकोने फिरविला बुलडोझर



उरण-चारफाटा येथील अनधिकृत बांधकाम बुलडोझरद्वारे हटविताना सिडकोचे पथक.

## अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांना चालणेही कठीण

लोकमत न्यूज नेटवर्क

**उरण :** उरण-चारफाटा येथील रस्ता, वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या सुमारे ६० हातगाड्या, टपऱ्यांवर सिडकोने कारवाईचा बुलडोझर फिरवला. उरण-चारफाटा, एसटी स्टँडवर परिसरात अनधिकृत हातगाड्या, टपऱ्यांचे पेव फुटले होते. रस्त्यावर, कडेला, पदपथ आदी ठिकाणच्या या हातगाड्या, टपऱ्यांमुळे पादचाऱ्यांना चालणे कठीण झाले होते.

सिडको अनधिकृत बांधकामे, हातगाड्या, टपऱ्यांवर कारवाई करते. यासाठी मोठ्या प्रमाणावर पोलिस फौजफाटा, सिडको अधिकारी, कर्मचारी, यंत्र सामग्रीचा वापर केला जातो. यावर शासनाकडून लाखो रुपयांचा खर्च केला जातो. मात्र सिडकोच्या कारवाई पथकाची पाठ फिरताच त्याच जागी पुन्हा अनधिकृत बांधकामे उभारली जातात.

**६०**
**जणांवर कारवायांसाठी राबवली मोहीम**

## रस्त्याने घेतला मोकळा श्वास

सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे अधिकारी भारत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आणि पोलिस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली. यामुळे चारफाटा येथील रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे. सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे अधिकारी भारत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आणि पोलिस बंदोबस्तात कारवाई केली. यामुळे चारफाटा येथील रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे.

## केवळ दिखाव्यासाठी तोडक कारवाई...

सिडकोने फक्त दिखावा करण्यासाठी तोडक कारवाई न करता पुन्हा अनधिकृत हातगाड्या, टपऱ्यांचे बस्तान बसणार नाही याची दक्षता घेण्याची गरज असल्याच्या प्रतिक्रिया संतप्त नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

पुण्य नगरी
Navi Mumbai Edition
Jan 21, 2025 Page No. 03

# उरण परिसरातील अनधिकृत बांधकामांवर सिडकोची कारवाई



उरण : सिडकोच्या वतीने सोमवार, २० जानेवारीला उरण चारफाटा येथील अनधिकृत बांधकामांसोबतच येथील फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली. या वेळी मोठ्या प्रमाणावर पोलीसबंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

चारफाटा हा उरण शहर, पिरवाडी, करंजा येथील प्रवेशद्वार आहे. येथे अनधिकृत फेरीवाले आणि टपऱ्याधारकांनी अतिक्रमण करीत पदपथांसह निम्मे रस्ते काबीज केले होते. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती. त्याचा त्रास येथील नागरिकांना सहन करावा लागत होता. याप्रकरणी अनेक तक्रारी सिडकोला प्राप्त झाल्या होत्या. त्यातच रविवारी येथील वाहतूक कोंडीत आणखीच भर पडत होती. त्यामुळे नागरिकांना येथून चालणे अवघड होत होते. त्यामुळे येथील अतिक्रमणावर कारवाई करण्याची मागणी नागरिक करीत होते. त्यावर नागरिकांच्या आलेल्या तक्रारी व त्यांना होत असलेला त्रास याची दखल घेत सिडकोने सोमवार, २० जानेवारीला ही कारवाई केली. उरणच्या चारफाटा येथे सिडकोकडून वारंवार येथील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात येते, मात्र तरीही येथे अतिक्रमण सुरुच असते, असे नागरिक सांगत आहेत.

सिडकोने येथील रस्त्यांकडे पदपथ तयार केली आहेत. मात्र, या पदपथावर अनधिकृत बांधकामे केली जातात. तर, काही ठिकाणी फेरीवाले आपले बस्तान बसवतात. त्यांच्यावर सिडकोकडून वारंवार कारवाई केली जाते, मात्र काही दिवसांनंतर येथे 'ये रे माझ्या मागल्या' अशी परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे ही परिस्थिती गेल्या १५ वर्षांपासून सुरू असल्याने येथील अतिक्रमणधारक व फेरीवाल्यांना सिडको प्रशासन आणि पोलिसांची भीती वाटत नसल्याचे नागरिक बोलत आहेत.

**CIDCO**
WE MAKE CITIES

NEWS

आपलं नवे शहर रविवार, १९ जानेवारी २०२५

# 'नवी मुंबई मेट्रो'चे २० जानेवारी पासून सुधारित वेळापत्रक

## सकाळी, सायंकाळी सर्वाधिक गर्दीच्या वेळी दर १० मिनिटांनी मेट्रो



**सीबीडी**: 'सिडको'च्या बेलापूर ते पेंधर या मेट्रो मार्ग क्रमांक-१ वर २० जानेवारी २०२५ पासून 'मेट्रो'च्या फेऱ्यांचे सुधारित वेळापत्रक लागू होणार असून सकाळी आणि सायंकाळी सर्वाधिक गर्दीच्या वेळी दर १० मिनिटांनी मेट्रो धावणार आहे. 'मेट्रो'च्या फेऱ्यांमध्ये वाढ झाल्याने गर्दीच्या वेळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा लाभ होणार आहे.

'सिडको'तर्फे नवी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत मेट्रो मार्ग क्र.१ बेलापूर ते पेंधर विकसित करण्यात आला आहे. या मार्गावर १७ नोव्हेंबर २०२३ पासून मेट्रो सेवेचे परिचालन सुरू झाले असून या मेट्रो सेवेला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. सीबीडी-बेलापूर परिसर, तळोजा औद्योगिक क्षेत्र आणि 'सिडको'च्या गृहसंकुलांना या मेट्रो मार्गाद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे.

सर्वाधिक गर्दीच्या वेळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना वाढीव मेट्रो

**(उर्वरित पान २ वर)**

### 'नवी मुंबई मेट्रो'चे...

(पान १ वरुन)

फेऱ्यांचा लाभ व्हावा याकरिता सदर मार्गावर २० जानेवारी पासून मेट्रो फेऱ्यांचे सुधारित वेळापत्रक लागू करण्यात येणार आहे. सुधारित वेळापत्रकानुसार बेलापूर आणि पेंधर स्थानकांतून सकाळी ६ वाजल्यापासून मेट्रो सेवा सुरु होणार आहे. बेलापूर येथून रात्री १० वाजता आणि पेंधर येथून रात्री ९.४५ वाजता 'मेट्रो'ची शेवटची फेरी धावणार आहे. सर्वाधिक गर्दीच्या वेळेत बेलापूर येथून सकाळी ७.३० ते १० आणि सायंकाळी ५.३० ते ८ तर पेंधर येथून सकाळी ७ ते ९.३० आणि सायंकाळी ५ ते ७.३० दरम्यान दर १० मिनिटांनी 'मेट्रो'ची फेरी होणार आहे. सर्वाधिक गर्दीच्या वेळा वगळता उर्वरित वेळांमध्ये बेलापूर आणि पेंधर येथून दर १५ मिनिटांनी मेट्रो धावणार आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

सकाळ मुंबई, मंगळवार, २१ जानेवारी २०२५

# खाडीपूल वर्षभरात सेवेत

## तळोजा-खारघर जोडणार; ९६ कोटी खर्चातून उभारणी

खारघर, ता. २० (बातमीदार) : तळोजा-खारघर खाडीवर १.१ किलोमीटर लांबीच्या उड्डाणपूल उभारणीचे काम वेगात सुरू आहे. या पुलामुळे खारघरवरून थेट तळोजा वसाहतीत विनाअडथळा जाता येणार असून, मे २०२६पर्यंत हा खाडीपूल सुरू करण्याचा सिडकोचा मानस आहे. या पुलासाठी सिडकोच्या वतीने ९६ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

खारघर वसाहतीनंतर सिडकोने तळोजा वसाहत उभारणीस सुरुवात केली होती. तळोजा वसाहतीच्या वाढत्या विकासामुळे नागरिकांनी या ठिकाणी घरे घेऊन वास्तव्याला सुरुवात केली. वाढत्या लोकसंख्येमुळे सिडकोने तळोजा वसाहत फेज एक या ठिकाणी रेल्वे रुळाखालील भुयारी मार्ग उभारला तसेच तळोजा फेज दोन येथील पेंधर पुलाकडे लक्ष केंद्रित करून अनेक वर्षे खितपत पडलेल्या पेंधर पुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. दरम्यान, मागील वर्षी जुलै महिन्यात पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडून खाडीमार्गे पूल उभारणीसाठी परवानगी प्राप्त होताच ऑगस्ट महिन्यात प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली होती. खारघरवरून पेंधर उड्डाणपुलादरम्यान जोडण्यात येणाऱ्या रस्ते बांधकामासाठी सिडको ९६ कोटी रुपये खर्च करणार आहे. हे काम मे. जे. एम. म्हात्रे इन्फ्रा प्रा. लिमिटेड या कंपनीला देण्यात आले आहे. याविषयी सिडको अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, खाडीपूल उभारणीसाठी १८ महिन्यांचा कालावधी आहे. पुढील वर्षी मे-जून २०२६ पर्यंत खाडी पूल सुरू करण्याचा मानस आहे.



खारघर : तळोजा-खारघर खाडीवरील पुलाचे काम सुरू आहे.

### प्रवास सुखकर होणार!

सिडकोकडून तळोज्यामध्ये मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प उभारणीचे काम सुरू आहे. तळोजा खाडीपुलाच्या कामाने वेग घेतला असून, तुर्भे-खारघर लिंक रोडच्या कामाला सुरुवात झाली आहे. सिडकोकडून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तळोजा वसाहतीमधील सेक्टर २८, २९, ३१, ३४, ३६, ३९ व ४०मध्ये अनेक गृहप्रकल्प उभारले जात आहेत. तुर्भे-खारघर लिंक रोडमुळे खारघरवरून तळोजा वसाहतीत विनाअडथळा जाता येणार असल्यामुळे नव्या गृहप्रकल्पातील नागरिकांचा प्रवास सुखकर होणार असल्याची चर्चा सुरू आहे.

### भुयारी मार्गावरील ताण होणार कमी

तळोजा वसाहतीत प्रवेश करण्यासाठी सिडको आणि रेल्वेच्या माध्यमातून तळोजा शीघ्र कृती दलासमोरील रेल्वे ट्रॅकखालून तळोजा फेज एक वसाहतीत प्रवेश करण्यासाठी भुयारी मार्ग उभारला आहे. भुयारी मार्गातून तळोजा फेज एक आणि दोन वसाहतीत एनएमएमटी बस तसेच रिक्षा आणि खासगी वाहनांतून नागरिक प्रवास करतात. खारघर खाडीपुलाचे काम पूर्ण झाल्यास थेट खारघरवरून तळोजा फेज दोन वसाहतीत प्रवेश करता येणार असल्यामुळे भुयारी मार्गावरील ताण कमी होणार आहे. त्यामुळे नागरिकांसह वाहनचालकांतून समाधान व्यक्त होत आहे.